सं.फौ.प्र.क्र.६/२०२१
सरकार -वि- विजय
**निशाणी क्र.१० खाली**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - नवलसिंग बाबुसिंग सोळंके ,
वय - ३३ वर्षे, व्यवसाय – ग्रामपंचायत कर्मचारी,
रा. - वाकोडी, ता. मलकापूर, जि. बुलढाणा.

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. मी आरोपीला ओळखत असून तो माझ्या गावचा रहिवासी आहे. तेथे मी १० वर्षांपासून कार्यरत आहे. सन २०२० मध्ये आमच्या ग्रामपंचायतचे सचिव कैलास चौधरी हे होते. घटना ही ४ ते ५ वर्षांपूवी दुपारच्या वेळेस घडली होती. त्यावेळी मी माझ वसुलीचे काम संपवून गावामध्ये आलो होतो व मला ग्रामपंचायत जवळ लोकांची गर्दी दिसली. त्यानंतर मला ग्रामपंचायतमध्ये काही तरी झाले असे मला माहीती पडले. कालांतराने मला माहीती पडले की, ग्रामपंचायतमधील सीसीटीव्ही कॅमेरा फुटला आहे.

*(साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी कलम १५४ भारतीय पुरावा कायदा नुसार देण्यात येत आहे.)*

०२. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ मध्ये ग्रामपंचायतने जो कोणी कर भरणार नाही त्याशिवाय कोणालाही दाखल नमुना आठ वगैरे मिळणार नाही असा ठराव ग्रामपंचायतने घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.२४.१२.२०१९ रोजी पाणीपुरवठा शुध्दीकरण केंद्र, मधुबन नगर, गाडेगाव येथे ग्राम सभा होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी ग्रामपंचायतचे सचिव व इतर पदाधिकारी त्या सभेला हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी माझ्यासोबत शिपाई तुळसिराम गणेश कुयटे व पाणी पुरवठा शिपाई समाधान असे हजर होते. साक्षीदार पुढे स्वतःहून सांगतो की, मी हजर नव्हतो. ते दोघेजण हजर होते. त्या दिवशी मी सुट्टीवर नव्हतो. माझ्या कार्याची वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० पर्यंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंयातच्या कर्मचा-यांना ग्रामसेवक / सचिव यांची परवानगी घेतल्याशिवाय ग्रामपंचायत कार्यालय सोडता येत नाही. त्या दिवशी मला वसुलीकरिता ग्रामसेवक / सचिव यांनी लेखी आदेश दिले नव्हते. घटनेच्या आठ दिवस पूर्वी आरोपीने ग्रामपंचायतला नमुना आठ मिळण्याकरिता अर्ज दिल्याचे मला माहीत नाही. हे

म्हणणे खरे आहे की, आरोपीने ग्रामपंचायत कर न भरल्यामुळे त्यास नमुना आठ हा नाकारला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस कागदपत्र न दिल्यास आरोपी हा ग्रामपंचायत कर्मचा-यांची तक्रार सारखा करीत असतो. मी वसुलीकरिता बाहेर गेलो असल्यामुळे ग्रामसेवक हे ग्रामसभेला गले असल्यामुळे त्यांनी ग्रामपंचायतच्या लोखंडी दरवाज्याला कुलुप लावल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जर ग्रामपंचायतच्या लोखंडी दरवाज्याला कुलुप लावले असेल तर तरी देखील ग्रामपंचायतमध्ये भिंतीवरून उडी मारून येता येते.

प्रश्न- घटनेच्या दिवशी दुपारी आरोपी हा लोखंडी गेट बंद असतांना भिंतीवरून उडी मारून ग्रामपंचायतमध्ये प्रवेश केला व शिवीगाळ करुन त्याने आणलेल्या दगडाने ग्रामपंचायत कार्यालयाचा सीसीटीव्ही कॅमेरा फोडला?

उत्तर- मी वसुलीला गेलो होतो मला काही माहीत नाही.

प्रश्न- कॅमेरा फोडल्यानंतर त्याने आम्ही हजर असलेल्या तिन्ही कर्मचा-यांना आरोपीने शिवीगाळ केली?

उत्तर- मी वसुलीला गेलो होतो मला काही माहीत नाही.

प्रश्न- म्हणून मी त्याला विचारले की, तोडफोड का करतोय असे त्यास विचारले असता त्याने मला सांगितले की, आठ दिवसांपूर्वी नमुना आठ मागितला होता परंतु तो मला दिला नाही म्हणून तो आता कसा देत नाही पाहून घेतो अशी धमकी त्याने दिली?

उत्तर- माझ्यासमोर काहीही घडलेले नाही.

प्रश्न- आमच्या गावाचे माजी सरपंच अनिलसिंग पदमसिंग गौर यांनी आरोपीस समजविले होते व नंतर समाधान जाधव यांनी सचिव यांना फोनद्वारे घटनेची माहीती दिली?

उत्तर - माझ्यासमोर माहीती दिलेली नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेची फिर्याद सचिव कैलास चौधरी यांनी पोलीस स्टेशनला दिली होती. या घटनेसंबंधी मी पोलीसांना जबाब दिला होता.

प्रश्न- दि २४.१२.२०१९ रोजी घडलेली घटना मी पोलीसांना सांगितली होती?

उत्तर- मला साहेबांनी घटनेबाबत सांगितले होते.

०४. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग वाचून दाखविण्यात आला. पोलीसांनी तसा जबाब माझ्या बयाणात का लिहीला याचे कारण मी सांगू शकत नाही. त्यास भाग अ देण्यात येतो. मी वाकोडी येथे माझ्या जन्मापासून राहातो. मी

आरोपीला चांगल्या प्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला वाचविण्याकरिता आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.वानखेडे यांच्यामार्फत-</u>**

०५. पोलीसांनी माझा जबाब कधी घेतले होते हे मला आठवत नाही. मी दिलेला जबाब पोलीसांनी मला वाचून दाखविला नव्हता. मी पोलीसांना दिलेला जबाब हा ग्रामसेवक साहेबांनी सांगितल्याप्रमाणे दिलेला आहे. तुळसिराम गणेश कुयटे हे ग्रामपंचायत शिपाई, समाधान हा पाणीपुरवठा शिपाई व मी वसुली करणारा ग्रामपंचायत शिपाई आहे. मी घटनेच्या दिवशी वसुलीकरिता ग्रामपंचायत सचिव यांच्या आदेशावरून मधुबन नगर गोकुलधाम व आदर्श नगर येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या दिवशी काय घटना घडली याबाबत मला प्रत्यक्षात माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतचा गेट व भिंती हे साधारण सहा ते सात फुट उंच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या गेट व भिंतीवरून सहजासहजी कोणीही येवू शकत नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक :१२/०५/२०२६.

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.05.12 00:14:54 +0530

( पी.एस. ठाकरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट क्र. १, मलकापूर